जळगाव दि.७ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ऑक्टोबर, २०१९ पूर्वी पदवी /पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकरीता आणि पीएच.डी.धारकांना २९ व्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठ संकेतस्थळावर भरण्याची मुदत वाढवून देण्यात आली आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २९ व्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in वर होम पेज वरील स्टुडंट कॉर्नर, परीक्षा, कॉन्व्होकेशनवर विद्यार्थ्यना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरता येणार आहे. हे अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. तसेच माहे एप्रिल/मे, २०२० च्या होणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतचा कालावधी परीक्षा निकाल जाहिर झाल्यानंतर कळविण्यात येईल असे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी कळविले आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.७ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये आयोजित व्दितीय वर्ष विज्ञान सत्र ३ आणि सत्र ४ च्या विषयांची परीक्षा वेळापत्रकाबाबत परीपत्रक क्र.३२९/२०२० आणि व्दितीय वर्ष कला सत्र-४ च्या विषयांच्या परीक्षां वेळापत्रका संदर्भात परीपत्रक क्र.३३०/२०२० ही सुधारित परीपत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे माहे मार्च/एप्रिल/मे २०२० मध्ये आयोजित विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. नव्याने परीक्षांचे आयोजन करतांना विद्यापीठ परीपत्रक क्र.३२९/२०२० अन्वये व्दितीय वर्ष विज्ञान सत्र ३ आणि सत्र ४ च्या विषयांची परीक्षा आणि परीपत्रक क्र.३३०/२०२० नुसार व्दितीय वर्ष कला सत्र-४ च्या विषयांची सुधारित वेळापत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहिर केली आहेत. तांत्रिक अडचणीमुळे या वेळोपत्रकानुसार काही विषयांची परीक्षा ही पूर्वीच्या जाहिर केलेल्या वेळापत्रकातील दिनांकानुसार/वेळेनुसार न होता त्याऐवजी दिनांक /वेळेत बदल करण्यात आलेले आहेत. या परीक्षांची पूर्वी जाहिर केलेली परीपत्रक क्र.२७८/२०२० आणि परीपत्रक क्र.२९५/२०२० ही रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे महाविद्यालये आणि संबंधित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आवर्जुन ही परीपत्रके अवलोकनात आणावीत आणि परीक्षेचे विषय, तारीख व वेळेतील बदल लक्षात घ्यावा असे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी कळविले आहे.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०२०                                        दिनांक : ७.१०. २०२०

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी